सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/


वर्ष १ ले | अंक : १६१ | मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**निवेदन**

मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ रोजी 'धूलिवंदन' अर्थात धुळवड असल्याने कार्यालय बंद राहील. त्यामुळे बुधवार, दि. ४ मार्च २०२६ रोजी अंक प्रसिद्ध होणार नाही, याची वाचक, विक्रेते, जाहिरातदार व हितचिंतक यांनी नोंद घ्यावी.

–संपादक



**श्री. दिलीप पाटील**
राष्ट्रीय मंत्री– सहकार भारती



**डॉ. लीना चौधरी**
आयुर्वेद तज्ञ



**श्री. सतिष मुंडके**
निवृत्त एल.आय.सी. अधिकारी



**श्री. प्रकाश पाठक**
सेवानिवृत्त पोलीस



**श्री. संजीव पाटील**
पत्रकार



**श्री. मिलींद कुडे**
अनिरुद्ध बापू परिवार



**श्री. राकेश मराठे**
अमळनेर



**सौ. शोभा बावीस्कर**
मुख्याधिकारी




अमळनेर : सिंधी कॉलनी येथे साफसफाई मोहीम राबविताना नगरसेवक भरत ललवाणी व डॉ. डिगंबर महाले. पालिकेच्या गोडावूनमध्ये पडून असलेल्या एक्सपायरी डेटेट बीएचसी पावडरच्या थैल्या व केमिकलचे छोटे बॅरल, खराटे, डस्टबिन्स आदी. खराट्याचा निकृष्ट दर्जा स्पष्ट दिसतो आहे.


# जीवंत माणसांवर 'मेलेली' फवारणी!

## पालिकेचा बेरहम कारभार, कर्मचाऱ्यांसह नागरिकांच्या जीवाशी खेळ...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पालिकेतर्फे कीटकनाशक फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या बीएचसी पावडर व इतर केमिकल्सबाबत धक्कादायक माहिती समोर आली आहे. २०२३ मध्ये पॅकिंग झालेले आणि २०२४ मध्ये मुदत संपलेले केमिकल सध्या वापरात असल्याचे उघड झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनीही एक्सपायरी मटेरियल वेळेत नष्ट (डिस्पोज) करण्यात आले नाही, अशी कबुली दिल्याने खळबळ उडाली आहे.

विशेष म्हणजे बीएचसी पावडरच्या थैलीवर उत्पादन दिनांक नमूद असला तरी स्पष्ट एक्सपायरी डेट छापलेली नाही. काही थैल्यांवरील मुदत आधीच संपल्याचे सॅनिटरी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचेही म्हणणे आहे. तरीही हेच केमिकल्स शहरात फवारले जात असल्याने नागरिकांच्या तसेच फवारणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्याशी उघडपणे खेळ सुरू असल्याची तीव्र टीका होत आहे.




पालिकेच्या सत्तांतरानंतर नगराध्यक्ष, नगरसेवक आणि सभापती यांची राजवट सुरू होऊन आता दोन महिने झाले आहेत. या दोन महिन्यात लोकांच्या आरोग्याशी निगडीत असलेल्या अत्यंत गंभीर बाबींबाबत लक्ष देण्यास कोणालाच वेळ मिळाला नाही काय ? की सुरू असलेल्या अत्यंत जीवघेण्या प्रकाराबाबत सर्वांचीच मूक संमती आहे ? अशी शंका उपस्थित होते. मुख्याधिकारी व आरोग्य विभागातील जबाबदार अधिकारी तर नगराध्यक्षांच्या पदभार स्वीकारण्यापूर्वीपासूनच सेवारत (?) आहेत. गंभीर आरोग्यविषयक बाबीकडे संबंधितांचे दुर्लक्ष का? मुळातच जितके केमिकल्स लागतील तितकेच मागविले पाहिजेत. एक तर पालिकेने आवश्यकतेचा अंदाज न घेता जादा माल मागविला असेल किंवा आलेला माल एक्स्पायर होईपर्यंत तो वापरलाच नसेल. एक्स्पायरी डेटेड केमिकल्स तत्काळ नष्ट करण्याची एक पद्धत आहे. त्याची दीर्घकाळ अंमलबजावणी न करून संबंधितांनी नागरिक आणि कामगारांच्याही जिवाशी अक्षम्य खेळ खेळलेला दिसून येतो.

दरम्यान, सफाई कर्मचाऱ्यांनीही साहित्याच्या निकृष्ट दर्जाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. आम्हाला झाडू मिळत नाही, अशी तक्रार एका बाजूला होत असताना, प्रत्यक्षात गोदामात मोठ्या प्रमाणावर झाडू साठवलेले असल्याची चर्चा आहे. मात्र, हे झाडू अत्यंत निकृष्ट दर्जाचे असून दोन दिवसही टिकत नाहीत, अशी तक्रार कामगारांनी केली आहे. हीच बाब डस्टबिनच्या बाबतही आहे. कामगार म्हणतात की आम्हाला डस्टबिन उपलब्ध करून दिले जात नाहीत. प्रत्यक्षात मात्र पालिकेच्या आरोग्य विभागाच्या गोडावूनमध्ये भरपूर डस्टबिन आहेत.

एक्सपायरी झालेली पावडर व केमिकल्स सर्रास वापरणाऱ्यांविरोधात कोणती कारवाई होणार? दोषींवर जबाबदारी निश्चित केली जाणार का? असा प्रश्न आता नागरिकांसमोर उभा राहिला आहे. शहरातील आरोग्यव्यवस्था आणि स्वच्छता मोहिमेच्या नावाखाली चाललेल्या या बेफिकीर कारभाराची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

### असा उघड झाला गैरप्रकार

सोमवार, दि. २ मार्च रोजी सकाळी ७ वाजता नगरसेवक डॉ. डिगंबर महाले व भरत ललवाणी स्वच्छता मोहीम राबविण्यासाठी सिंधी कॉलोनीत गेले होते. तेथे डॉ. महाले यांनी बीएचसी पावडरची थैली पाहिली. त्यावर मॅन्यूफॅक्चरींग आणि एक्स्पायरी या दोन्हीही तारखा नव्हत्या. तसेच केमिकलच्या कॅनवर मॅन्यूफॅक्चरींग २०२३चे होते आणि एक्स्पायरी डेट २०२४ची होती. याबाबत डॉ. महाले यांनी मुख्याधिकारी गणेश शिंदे, आरोग्य निरीक्षक कंडारे यांच्याशी मोबाईलवरून संपर्क साधून संबंधित गैरप्रकाराची माहिती दिली. मात्र, या दोन्ही अधिकाऱ्यांनी आम्ही रजेवर आहोत, रुजू झाल्यावर माहिती घेतो असे सांगितले. यावर डॉ. महाले व श्री. ललवाणी यांनी थेट पालिकेचा आरोग्य विभाग गाठला. तेथे आरोग्य निरीक्षक संतोष जाधव व श्री. बच्छाव यांना त्यांनी एक्स्पायरी डेटेट औषधींबाबत विचारणा केली. त्यावर श्री. बच्छाव यांनी नजरचुकीने दिले गेले असे सांगितले. त्यामुळे श्री. जाधव व श्री. बच्छाव या दोघांना घेऊन डॉ. महाले व श्री. ललवाणी यांनी पालिकेचे आरोग्य विभागाचे गोडावून गाठले. तेथे एक्स्पायरी डेटेट माल भरपूर प्रमाणात आढळला. तसेच निकृष्ट दर्जाचे झाडू (खट्टा), डस्टबिन व अन्यही साहित्य होते.



"पूर्वी प्रशासकीय कालावधीत आतापर्यंत जो काही साहित्य पुरवठा करण्यात आला आहे याची माहिती घेण्यात येईल. संबंधित कॉन्ट्रॅक्टर किंवा ठेकेदार असतील, त्यांचीही चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

– **डॉ. परीक्षित बाविस्कर,** नगराध्यक्ष.



"एक्स्पायरी संपलेल्या औषधींबाबत माहिती मिळाली आहे. याबाबत प्रत्यक्ष गोडाऊनवर जाऊन पाहणी करणार आहे. गोडाऊन मध्ये पडलेला माल किती ? त्याची एक्सपायरी डेट काय आहे ? याची शहानिशा करून योग्य ती कारवाई करण्यात येईल

–**प्रशांत निकम,** उपनगराध्यक्ष.

"गोदामामध्ये जुने साहित्य असून त्याची गुणवत्ता योग्य नाही. ते कर्मचाऱ्यांना देणे उचित नाही. विभागप्रमुख म्हणून मला एक महिना झाला आहे. तेथे एक्सपायर झालेले साहित्य पडून आहे. साधारणतः २०२४– २५ मध्ये ते एक्सपायर झालेले आहे.

– **संतोष जाधव,** आरोग्य निरीक्षक



"शहरात अनेक ठिकाणी डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे. साथीचे रोग फैलावून जनसामान्य त्रस्त होऊ नयेत, यासाठी लोकांच्या कष्टाच्या व घामाच्या कररुपी पैशातून पालिका विविध प्रकारच्या फवारण्या करीत असते. त्यासाठी लागणारे केमिकल्स जर निकृष्ट दर्जाचे आणि मेलेले वापरत असतील तर असे करणारे म्हणजेच लोकांच्या जीवाशी खेळणाऱ्यांचाही जीव टांगणीला लागेल अशी कारवाई झाली पाहिजे. आमदार अनिलदादा पाटील यांनी सदर गंभीर प्रकाराबाबत विधिमंडळात आवाज उठवायला हवा, तर पालिकेचे मार्गदर्शक माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांनीही संबंधितांना वठणीवर आणले पाहिजे. मी याबाबत सर्वत्र लेखी तक्रारीही करीतच आहे.

**– डॉ. डिगंबर महाले, नगरसेवक**



"माझ्या वॉर्डात दीर्घकाळापासून अनेक समस्या आहेत. त्यातही स्वच्छतेच्या तर खूपच गंभीर समस्या आहेत. संबंधितांनी वॉर्डाच्या साफसफाईकडे कमालीचे दूर्लक्ष केले आहे. माझ्या वॉर्डात मोठ्या प्रमाणावर दलित, आदिवासी तसेच अल्पसंख्याक नागरिक मोठ्या प्रमाणावर आहेत. आज माझ्या वॉर्डातील स्वच्छता मोहीम राबविताना एक्स्पायरी डेटेट केमिकल्स पाहून फक्त धक्काच बसला नाही, तर संबंधित यंत्रणा किती बेरहम व माणुसकी कोळून प्यालेली आहे याची जाणीव झाली. संबंधितांना कठोर शिक्षा होईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाहीत.

**– भरत ललवाणी, नगरसेवक**



अमळनेर : श्री मंगळ ग्रह मंदिरात धूलीवंदननिमित्त करण्यात आलेली वैशिष्ट्यपूर्ण सजावट. (छायाचित्र : मयूर चौधरी)

### तुम्ही फक्त या आणि सहभागी होऊन आनंद घ्या

# 'रंग बरसे'ची यंदाही जय्यत तयारी

## प्रथमच फोम पार्टीचे विशेष आकर्षण, मुंदडा बिल्डर्सतर्फे आज शानदार आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : धूलिवंदननिमित्त मंगळवार, दि. ३ मार्च रोजी खास अमळनेरकरांसाठी आम्ही रंगतदार कार्यक्रमाची तयारी केली आहे. तुम्ही फक्त या आणि सहभागी होऊन मनमुराद आनंद घ्या, असे आवाहन मुंदडा बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्सकडून करण्यात आले आहे. सर्वांना याबाबत निमंत्रणही दिले जात आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही 'रंग बरसे' ची यंदाही जय्यत तयारी मुंदडा बिल्डर्सतर्फे करण्यात आहे आहे. या शानदार कार्यक्रमाचे आयोजन मुंदडा इस्टेट, ३०० बंगलोज, गलवाडे रोड, अमळनेर येथे सकाळी ९ वाजेपासून तेदुपारी ३ या वेळेत करण्यात आले आहे.

यंदाचे आकर्षण म्हणजे यंदा अमळनेरात प्रथमच फोम पार्टी आयोजित केल्याने रंगांसोबतच फोमचा मनमुराद आनंद घेता येणार आहे.

**अजून आकर्षण काय?**

याठिकाणी मोफत व्हीआयपी एन्ट्री, कौटुंबिक वातावरण, नॉन स्टॉप म्युझिक, डीजे इलेव्हन आणि व्ही. डीजे एरिएस धम्माल असणार आहे. यासोबतच या रंग बरसे



कार्यक्रमात रेन डान्स, ढोल धमाका, ऑर्गनिक कलर, फूड स्टॉल आणि लकी ड्रॉचा मनसोक्त आनंद घेता येणार आहे. या उत्सवाचे आयोजक असलेले मुंदडा बिल्डर्स अँण्ड डेव्हलपर्स, मुंदडा इस्टेट परिवार आणि हेलपिंग हँडस ग्रुपने जय्यत तयारी केली आहे. शहरातील विविध मंडळे, संस्था, महिला मंडळ, सामाजिक ग्रुप आणि मान्यवरांना सन्मानाने निमंत्रण दिले आहे. सर्वांनी सहपरिवार न चुकता या उत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

**सामाजिक एकात्मतेचा प्रयत्न**

सदर 'रंग बरसे' उत्सव म्हणजे केवळ आनंदाचा उत्सव नसून, या उत्सवातून सामाजिक एकात्मतेचा प्रयत्न मुंदडा बिल्डर्स परिवाराचा असतो. या माध्यमातून सर्व स्तरातील महिला व पुरुष तसेच युवक व युवती व राजकीय क्षेत्रातील मान्यवर आपसातील मतभेद तथा वैरभाव बाजूला सारून एकत्र येत असतात. प्रेम व आनंदाची देवाणघेवाण याठिकाणी होत असते. विशेष म्हणजे महिलांच्या सुरक्षेची विशेष काळजी म्हणून महिला पुरुषांची स्वतंत्र व्यवस्था याठिकाणी केलेली असते. प्राधान्याने महिला व युवती वगळता सहकुटुंब येणाऱ्यांनाच येथे प्रवेश दिला जात असतो. कोणताही गोंधळ होऊ नये यासाठी पुरेसे सुरक्षा रक्षक तैनात केलेले असतात. त्यामुळे आजपर्यंत एकाही वर्षी कोणताही अनुचित प्रकार याठिकाणी घडलेला नाही. म्हणूनच संपूर्ण शहरातून महिला भगिनी व युवतींची मोठी गर्दी येथे असते. कोणतीही भीती न बाळगता अतिशय जल्लोषात या उत्सवाचा आनंद ते घेत असतात. त्यामुळेच हा उत्सव म्हणजे अमळनेरकरांसाठी प्रेमाचे प्रतीकच ठरला आहे.

## संपादकीय

# होळी खेळा, पर्यावरणहानी टाळा!

देशात होळी हा सण प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या पद्धतीने सर्वत्र साजरा करण्यात येतो. यामुळे आपल्याला सर्वत्र होळी मीलन दिसून येते. महाराष्ट्रात मराठी माणसांसाठी होळीचे आगळेवेगळे महत्त्व आहे. होळी म्हणजे मराठी वर्षाचा शेवटचा सण. ज्याप्रमाणे इंग्रजी वर्षांनुसार डिसेंबर हा शेवटचा महिना असतो त्याचप्रमाणे होळीचा फाल्गुन महिना मराठी माणसासाठी शेवटचा आहे. नवीन वर्षाची सुरूवात चैत्र महिन्यापासून होते म्हणजेच 'गुढीपाडवा'. त्यामुळे जुने वर्ष होळी व धूलिवंदनाच्या रूपात साजरे करून जुन्या वर्षाला निरोप दिला जातो आणि गुढीपाडव्याच्या निमित्ताने नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते. बदलत्या काळानुसार होळी व धूलिवंदन साजरे करताना पर्यावरण व निसर्गाचे संतुलन जोपासणे अत्यंत गरजेचे आहे. त्याच अनुषंगाने कोणत्याही धर्माचे सण असो त्यांनी सुद्धा निसर्गाला कुठेही इजा पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. सद्य:स्थितीत वाढते प्रदूषण व भीषण पाणीटंचाई सर्वांसाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे. त्यामुळे होळी हा सण साजरा करताना पर्यावरणाशी निगडीत असावा. जेणेकरून निसर्गाला इजा पोहोचणार नाही. कारण होळी या सणाला लाकूड, पाणी यांचा वापर जास्त होतो आणि या दोन्ही गोष्टी पर्यावरणाशी अत्यंत निगडीत आहेत. होळीला दरवर्षी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणात होत असतो. त्यामुळे होळी या सणाला पाण्याचा वापर कमी करावा व पर्यावरणातील वाढते प्रदूषण पाहता स्वच्छतेकडे सर्वांनीच जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करावे. देशात आणि जगात पिण्याच्या पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि वाढणार सुध्दा आहे. त्यामुळे होळीच्या सणाला पाण्याचा वापर टाळावा व पाणी वाचविण्याचा संकल्प सर्वांनीच करावा. 'उष्णतेचे वादळ आणि पाण्याचा हा! हा! कार' यामुळे मानव व पशुपक्षी नेहमीच भरडत असतो आणि भरडत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे मानवाने भूभागावर पूर्णत: अतिक्रमण केल्याचे दिसून येते. देशात होळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो.

होळीच्या दिवशी गुलाल, रंग, वारीस इत्यादींसह केमिकलयुक्त रंगांचा वापर होताना आपण पाहत असतो. यामुळे डोळ्यांना व चेहऱ्याला इजा होऊ शकते. यापासून सावध राहण्याची गरज आहे. रंग खेळताना कोणीही हा विचार करत नाही की पाण्याचा व्यत्यय किती होतो. होळी या सणाला दरवर्षी लाखो लिटर पाणी वाया जात असते आणि पाण्याची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. उन्हाळ्यात पाण्यासाठी सर्वांनाच वणवण भटकावे लागते. आजही देशासह महाराष्ट्रात पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दीसते व याचा परिणाम शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भोगावा लागतो. आजच्या परीस्थितीत हवामान खाते सांगत आहे की यावर्षी उन्हाळा नेहमीपेक्षा जास्त तापणार आहे. यावरून आपण समजू शकतो की पाण्याची समस्या कमी न होता मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे आज पाण्याचा 'एक एक थेंब' वाचविण्याकरिता मानवाने चुरशीचे प्रयत्न केले पाहिजे. होळीचा सण हा पाच दिवस म्हणजेच पंचमीपर्यंत चालतो. त्यामुळे या काळात पाण्याचा वापर जास्तीत जास्त टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे. त्याचप्रमाणे देशात अवैधरित्या जंगल तोडीमुळे लाकडांची कमतरता पाहता होळी दहणाकरिता कमीत कमी लाकडांचा उपयोग केला पाहिजे किंवा होळी दहनाकरिता गोवरीचा वापर जास्त करावा. यामुळे पर्यावरणात सुगंध निर्माण होईल. देशात आणि जगात पाण्याची समस्या पाहता फक्त देशी गुलाल किंवा फुलांचा वापर करून होळी या महत्त्वपूर्ण सणाचा आनंद घ्यावा. आज पाण्याच्या भरवशावरच मनुष्य, पशुपक्षी, अन्नधान्य, संपूर्ण जीवसृष्टी, जंगल हे सर्व पाण्यावरच अवलंबून असते. पाणी हे 'सोने' समजा आणि होळीला फक्त 'गुलाल' किंवा फुलांचा वापर करून होळीचा सण साजरा करावा.

ज्याप्रमाणे मानवाला 'अन्न, वस्त्र, निवारा' या गोष्टींची गरज आहे त्याचप्रमाणे आज संपूर्ण जीवसृष्टीला व पृथ्वीला 'पाण्याची' नितांत गरज आहे. जंगलतोडीमुळे निसर्गाचे संतुलन विस्कळीत झाले आहे. त्यामुळे आज हिंसक पशू (वाघ, बिबट्या, अस्वल) इत्यादी अनेक प्राणी जंगलातून गावात व शहरात शिरकाव करताना दिसतात. कारण मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी जंगल संपदेवर अतिक्रमण केल्याचे दिसून येते. त्यामुळे जंगलातील प्राणी शहरात येत नसून आपण जंगलाकडे आगेकूच (अतिक्रमण) करीत आहोत. त्यामुळे होळीकरिता कमीत कमी लाकडांचा वापर केला पाहिजे. त्याचप्रमाणे होळीच्या निमित्ताने अवैध वृक्षतोड होण्याची शक्यता असते, ती ताबडतोब थांबविली पाहिजे. आता वाढत्या कारखान्यांमुळे आणि परमाणू परीक्षण आणि युद्धजन्य परिस्थिती यामुळे प्रदूषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे होळीला पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे. भारतासह संपूर्ण जगभर २२ मार्चला 'जागतिक जलदिन' पाळला जातो याची कृती होळीच्या सणापासून करावी व पाणी वाचवावे. कारण पाणी हे निसर्गाचे 'अनमोल रत्न' आहे. त्याला वाचविण्याचा प्रयत्न सर्वांनीच सर्व स्तरातून केला पाहिजे. इतर देशांप्रमाणे भारतसुद्धा पाण्याच्या बाबतीत 'रेडलाईट झोनमध्ये' आहे. त्यामुळे भारतसुद्धा पाणीटंचाईच्या केंद्रस्थानी असल्याचे दिसून येते. त्यामुळे होळीचे औचित्य साधून प्रत्येकाने आपल्या परिसरात एक-एक झाड लावून निसर्गाला पुनरुज्जीवित केले पाहिजे व सर्वांनीच पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे. यातच खऱ्या अर्थाने 'होळी व धूलिवंदन' दिसून येईल. त्यामुळे 'जान है तो जहान है' हा मूलमंत्र सर्वांनीच अंगीकारून पुढचे पाऊल टाकायला पाहिजे.

# चाळी, होळी आणि पुरणाची पोळी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गिरणगाव आणि गिरगावातील मराठी लोक चाळीतील घरे विकून, रोजगार गेल्याने, कुटुंब वाढल्याने वा घरांतील भांडणातून उपनगरांत वा पार त्या पलीकडे गेले आहेत. त्यातील काही आजही होळी, गणपतीला येथे येतात. पण चाळी, होळी आणि घरोघरी पुरणपोळी हे समीकरण संपत चालले आहे.

होळीच्या खूप आठवणी आहेत. गोरेगावच्या ४८ एकरातील पत्रा चाळीत राहत असताना १०-१५ रोडवर मिळून किमान २०-२५ होळ्या असत. गिरगाव, गिरणगाव याबरोबरच जोगेश्वरी, गोरेगाव, दहिसर, कुर्ला, भांडुप वगैरे ठिकाणी कोकणातील लोकांची मोठी वस्ती होती. या सणाचा उत्साह जसा कोकणात असे, तसाच मुंबईतील कोकणी मंडळींच्या वस्त्या आणि भागामध्येही असे. तेव्हा गिरगाव असो, गिरणगाव असो की मुंबईची उपनगरं, तिथल्या वेगवेगळ्या चाळीमध्ये कोकणातल्या लोकांची घरं होती. त्यामुळे अर्थातच होळी मराठी वस्त्या असलेल्या मुंबईतील सर्वच चाळीत मोठ्या श्रद्धेने आणि आनंदाने पेटवल्या जात आणि धुळवडही जोरात, पण आध्यात्मिक रंगानेच खेळली जाई. मुंबईतील चाळी यांचं होळी आणि पुरणाची पोळीशी नातं अगदी पूर्वापार. होळी जशी वर्षातून एकदा, तशीच पुरणपोळी ही फक्त त्याच दिवशी होत असे. त्यामुळे त्या पोळीचं अप्रूपही मोठं असे. या चाळी आणि मुंबईतले वरळी, वेसावे, खार दांडा अशा सर्व कोळीवाड्यातली होळीही खूप जोरात.

होळीच्या दोन-तीन दिवस आधीच मुंबईत राहणारे कोकणातले कामगार व कर्मचारी एसटीने गावाला निघून जात. होळी व गणपती गावातच असे त्यांचे ठरलेले असे. होळीला ग्रामदेवतेच्या पालखीचा मान यंदा आमच्या घरी आहे, असे त्यांचे म्हणणे असे. त्यामुळे ग्रामदेवतेच्या व पालखीच्या पूजेच्या सर्व सामानासह ते रवाना होत. वर्षभर पैसे वाचवून गावात आपल्या घराण्याचा मान वाढविण्याचा त्यांचा प्रयत्न असे. पगार कापला तरी चालेल, पण होळीच्या, गणपतीच्या दिवशी गावात पोहोचायला हवे, असे त्यांचे म्हणणे. जे गावी जायचे नाहीत, ते तितक्याच जोशात मुंबईच्या आपल्या चाळीतल्या होळीच्या तयारीला लागत. लहान मुलांपर्यंत सारे बापे त्यात गुंतून जायचे. होळीसाठी छोटा खड्डा केलाय ना यापासून पुरेसा लाकूडफाटा, गोवऱ्या यावर त्यांचे बारीक लक्ष. त्या रात्री किमान चिवडा व कडक बुंदी लाडू असायलाच हवेत, असा आग्रह असे.



गोरेगावच्या चाळीमध्ये होळीची तयारी महिनाभर आधीच सुरू होई. त्यात शाळकरी पोरांचा पुढाकार आणि त्यातल्या त्यात मोठा तो लीडर. नारळाच्या करंट्या जमा करायच्या, म्हशीच्या तबेल्यातून शेण आणून गोवऱ्या तयार करायच्या. दोन-चार महिने आधीच एखादे सुकलेले झाड हेरून ते कुऱ्हाडीने तोडायचे. ताडाची, पोफळीची अनेक झाडे होती. त्यांच्या झावळ्या फेब्रुवारीपासून पडायला सुरूवात होते. त्या व इतर झाडांच्या फांद्या जमा करून ठेवायच्या. होळीची तयारी अशी पूर्ण झालेली असे. तरीही चार दिवस आधी घरोघरी होळीच्या वर्गणीसाठी 'होळी रे होळी, पुरणाची पोळी, साहेबाच्या पाठीत बंदुकीची गोळी' म्हणत गँगने जायचे. चाळीतले लोक १० पैशांपासून एक रुपयापर्यंत वर्गणी द्यायचे. एखाद- दुसरा गेला की त्याला कटवायचे. त्या पैशातून होळीच्या दिवशी सकाळी तूप, हार, उदबत्त्या, थोडेसे चंदन, धूप, नारळ, पेढे, केळी, अबीर, गुलाल, काडीपेट्या हे आणायचे. सायंकाळी होळी दहनासाठी काठीला जुने कापड गुंडाळून टेंभा तयार करायचा. कॉलनीतील दोन-चार होळ्या पेटल्या की मग आमचीही याच्या, त्याच्या नावाने बोंबा मारत, अमक्याच्या तमक्याचा ढोल अशी साधी आणि काही वेळा अर्वाच्य शिवीगाळ करत होळी रात्री साडेदहाच्या सुमारास पेटायची. तोपर्यंत कबड्डी, आबादुबी, उभा खो-खो खेळायचे आणि होळी दहनानंतर गाण्याच्या भेंड्या वा पुन्हा खेळ. कोकणातील अनेक लोक तेथे राहत असल्याने त्यांचा उत्साह जोरात. मग पुलाव, भजी, पुरीभाजी असे भरपूर खाणे. पण होळी पेटली की काही जण दिसेनासे व्हायचे आणि रात्री उशिरा कोणाच्या घराबाहेरचे जुने कपाट, चपला, बाहेर वाळत घातलेले कपडे होळीत पडत.

सकाळी उठताच चोरी झालेल्यांच्या घरच्या शिव्या सुरू होत. शिमगाच तो, शिवाय चोरीचा राग. त्याच वेळी पुन्हा 'आयना का बायना, घेतल्याशिवाय राह्यना, पेटी को चावी लगता है, हम को पैसा मंगता है... एक आना, दो आना, तीन आना, चार आना' असे काही तरी गाणे म्हणत लोकांच्या दाराशी पैसे मिळेपर्यंत नाचत राहत असू. पोरे घरात शिरून रंग लावतील, या भीतीने पटकन पैसे देऊन फुटवले जायचे. हे दुपारी एक वाजेपर्यंत झाले की मग त्या पैशातून मिठाईची पार्टी आणि मग घरात येऊन आंघोळ. तेव्हा होळीची पूजा, ब्राह्मणाला बोलावणे वगैरे प्रकार नसायचे.

# रंग माझा वेगळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



रंगांचे आणि आपले असे एक अतूट नाते आहे. रंग हा फक्त डोळयांनी दिसणारा अनुभव नसून ती एक भावनिक, तसेच मानसिक संवेदना आहे. रंग आपल्या विचारांवर, भावनांवर आणि वर्तनावर प्रभाव टाकतात, आपण जेव्हा रंग पाहतो, तेव्हा तो दृश्यमय अनुभव आपल्या मनाचा ताबा घेतो, त्याच वेळी आपला मेंदू अनेक रसायने स्त्रवतो, रंग हे संपर्काचे शक्तिशाली माध्यम म्हणून वापरता येते.

रंग हे आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. आपल्या अवतीभवती सर्वत्र रंगाची पखरण झालेली आहे. पण आपले त्याकडे जाणीवपूर्वक लक्ष जात नाही. जरा विचार करा की जीवनात दोनच रंग असते तर?... फक्त काळा आणि पांढरा !! तर मग आयुष्य किती निरस झाले असते, जगणे कठीण झाले असते, त्यावरती बसलेल्या किमयागाराने त्याच्या कुंचल्याने आपल्या आजूबाजूला अनेक रंग शिंपडून ठेवले आहेत, रंग माषाजे उत्साह, अमर्याद आनंद, इंद्रधनुष्याचे सप्तरंग, अथांग समुद्राची निळाई, आकाशातील रंगांच्या अनेक छटा, सृष्टीचे सौंदर्वं, निसर्गाची असंख्य रूपे. आपले सण सुद्धा रंगांशिवाय साजरे होऊ शकत नाहीत. होळीचे विविध रंग, तसेच दिवाळीला रांगोळी आणि फटाक्यांचे डोळे दीपवणार रंग.

रंगांचे आणि आपले असे एक अतूट नाते आहे. रंग. हा फक्त डोळ्यांनी दिसणारा अनुभव नसून ती एक भावनिक, तसेच मानसिक संवेदना आहे. आपल्या सभोवताली पसरलेल्या रंगांच्या आविष्काराची, आपले डोळे सतत नोंद घेत असतात. नव्या उमेदीने जगण्याची ऊर्जा पुरवतात, रंग आपल्या विचारांवर, भाचनांवर आणि कर्तनावर प्रभाव टाकतात. असे म्हणतात की, आपले शारीरिक व मानसिक संतुलन राखण्यास रंग मदत करतात, रंगमानसशास्वाच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, रंग आपल्या भावना, निर्णय, शारीरिक प्रतिक्रिया आणि सामाजिक वर्तनावर सूक्ष्म आणि नाटयात्मक प्रभाव टाकतात. महणूनच घर सजावटीत रंगसंगतीला विशेष महत्त्व आहे.


तसेच आपण परिधान केलेल्या मेहराचाचा रंग आपले व्यक्तिमत्त्व उजळून टाकतो, आरोग्यशास्त्रात रंगांना अनन्यसाधारण महत्व आहे. 'कलरथेरपी', 'कानरपॉचर' ही तंत्रे रंगांचा आपल्या आरोग्यावर व मनावर होणाऱ्या परिणामांचा वेध घेतात. रंग आपल्या भावनांवर परिणाम करतात आणि त्याचा प्रभाव बेट आपल्या निर्णय क्षमतेवर आणि वागण्वावर होतो, रंगांचा मानवी वर्तनावर होणारा परिणाम हा विषय मानसशास्त्र, कला, रचना, मार्केटिंग आणि शिक्षण या क्षेत्रांशी जोडलेला आहे. संशोधनांतर्गत असे आढळून आले आहे की, वेगवेगळे रंग, वेगवेगळ्या भावना निर्माण करतात, काही रंग शांतता देतात, काही ऊर्जा वाढवतात, तर काही भूक किंवा जागरूकता वाढवतात.

सन २००० मध्ये स्कॉटलंडमधील ग्लासगी शहरात तिथल्या अधिकाऱ्यांनी शहराचे नूतनीकरण करण्यासाठी काही रस्त्यांवरील पिवळ्या रंगाचा प्रकाश देणारे दिवे बदालून, त्या जागी निळ्या रंगांचा प्रकाश देणारे दिवे लावले आणि काय आश्चर्य! ज्या रस्त्यांवर निळा प्रकाश देणारे दिवे लाकले होते, तिथे घडणाऱ्या गुन्ह्यांच्या प्रमाणात लक्षणीय घट दिसून आली. तसेच एक दुसरा अनुभव, २००५ साली जपानमधील नेरा शहरातील रेल्वे प्लॅटफॉर्मवरील दिवे बदलून तिथे निळ्या रंगांचे दिवे लावले. नंतर असे आढळून आले की, त्या वर्षीपासून त्या शहरात एकही आत्महत्येचा प्रकार घडला नाही. जपानमध्ये आता सगळ्या रेल्वे प्लॅटफॉर्म्सचर निळ्या रंगाचा प्रकाश देणारे दिवे आहेत.

# निसर्गातील बदलांचा उत्सव

होळी हा सण फार प्राचीन काळापासून साजरा करण्याची परंपरा आपल्या धर्मात आहे. पुराणातील कथेनुसार समाजातील वाईट शक्तींना आणि माणसा-माणसांतील राग, द्वेष नष्ट करण्यासाठी प्रतिकात्मक रूपात हा सण साजरा केला जातो. होळीच्या निमित्ताने केला जाणारा शिमगा हा एक प्रकारचा मानसिक उपचार असून मनातील किल्मिषे काढून टाकण्याचा तो एक मार्ग आहे. रंगांचा उत्सव हा परस्परातील स्नेहभाव वाढविण्यासाठी आणि वसंतोत्सवातील निसर्गाला फुटलेल्या नव्या पालवीच्या स्वागतासाठी साजरा करण्यात येणारा आनंदोत्सव आहे. पण अलीकडे या उत्सवाचे स्वरूप काहीसे बदलत चालले आहे. रासायनिक रंगांचा वापर, होळीसाठी होणारी वृक्षतोड यामुळे नैसर्गिक समतोल ढासळत चालला आहे. तो ढासळू न देणे आपले कर्तव्य आहे आणि ते आपल्याच हातात आहे.

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेस आपण या सर्वत्र होळीचा उत्सव साजरा करतो. यावेळी आपण मोठा आधी पेटवून त्याला नेवैद्य दाखवतो, पूजा करतो, शिमगा करतो. या सर्व कृतीमागे पुराणात असलेल्या कथेची परपत आहे. प्राचीन काळी होलिका नावाची राक्षसीण होती. ती लहान मुलांना खूप जस द्यायची. त्यामुळे तिच्याबद्दल खूप भय निर्माण झाले होते. ही राक्षसीण जळून जावी म्हणून त्या काळी मोठ्या प्रमाणात होळी पेटविण्याची परंपरा सुरू झाली. तसेच तिने मुलांजवळ येऊ नये, घाबरून पळून जावे म्हणून मोठ्या आवाजात शिमगा करण्याची पद्धत रुढ झाली. शंखध्वनी करणे, बॉम्ब मारणे हे शब्द त्यातूनच निर्माण झाले. थोडक्यात वाईट शक्तीला हुसकावून लावणे असा त्यामागचा अर्थ आहे. प्रत्येक माणसाच्या मनात कुठल्या ना कुठल्या वाईट विचारांचा, गोष्टींचा प्रादुर्भाव असतो. मनातील या भावना व्यक्त केल्या तर मन मोकळे होते. अर्वाच्य बोलणे, शिवीगाळ करणे यासारखी कृती केल्यामुळे मनातील राग, द्वेष या निमित्ताने बाहेर पडतो, भावना मोकळ्या होतात. मनातील एखाद्याबद्दलचा आकस सैल होतो. म्हणूनच या दिवशी अशा पद्धतीने शिमगा करण्याची पद्धत आहे. मनातील या कटू भावना काढून टाकून मन पुन्हा ताजेतवाने बनविण्यासाठी हो पद्धत रूढ झाली असावी. म्हणूनच यावेळी एखाद्याला काही बोल लावले तरी त्याचा राग येऊ देऊ नये, असे म्हटले जाते. हा एक मानसिक उपचार आहे, असेही मानतात. म्हणूनच या वेळी 'बुरा ना मानो होली हैं' असे म्हणतात. यावेळी प्राचीन काळी होलिका नावाच्या राक्षसिणीचे दहन आले होते. म्हणून याला होलिका दहन असे नाव पडले. आपण ज्याप्रमाणे इतर सणांच्या निमित्ताने श्रीखंड, शिरा, लाडू, करंज्या असे गोडाधोडाचे पदार्थ करतो तसे होळीच्या निमित्ताने घराघरांत पुरणपोळी केली जाते. हा वसंतोत्सवाचा काळ असतो. हवेतील गारठा संपून म्हणजेच थंडी संपून हवामानात उष्णता वाढण्याकडे कल असतो. अशा काळात होळी पेटवून त्यातून वातावरण तापण्यास मदत केली जाते. जेणेकरून हवामानातील हे बदल लवकर व्हावेत आणि पुढचा मान्सून लवकर यावा, असा उद्देश असतो.







# विप्रो कंपनीस जोडणाऱ्या रस्त्यासाठी आंदोलन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील विप्रो कंपनीला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. नवीन रस्त्याचे कामही रखडले आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते आत्माराम अहिरे यांनी सोमवार, दि. २ मार्च पासून बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. याबाबत त्यांनी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की विप्रो कंपनी अमळनेरकरांसाठी भुषणावह आहे. मात्र, विप्रो कंपनीकडे जाणाऱ्या रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था आहे. या रस्त्यावरून शेकडो कामगार, नागरिक तसेच अवजड वाहनांची वाहतूक होत असते. मात्र, या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्याबाबत वारंवार निवेदन देऊनही प्रशासनाचे याकडे दूर्लक्ष आहे. नवीन रस्त्याचे कामही अद्याप सुरू झालेले नाही. त्यामुळे विप्रो कंपनीला जोडणाऱ्या रस्त्याचे काम तात्काळ मंजूर करून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# सातपुड्यातील होळी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

फाल्गुन महिना लागताच सातपुड्यात आदिवासींच्या पाड्या-पाड्यां वर उत्साहाचे वारे वाहू लागतात. फाल्गुन पौर्णिमेला होळी जळणार असते. थेट अंकलेश्वर, डेडियापाडा, अमलीबारी, मोलगी, काठीपासून वैजापूर, करजाणे, देवझिरी, लंगडाआंबा, शिरवेल, पाल, बऱ्हाणपूरपर्यंत होळीची तयारी सुरू होते. नवे कपडे शिवले जातात. चांदीचे दागिने विकत घेतले जातात. वाद्यांची दुरुस्ती होते. ग्रामदेवतांना नवस बोलले जातात. घराच्या भिंतींना रंगरंगोटी चालते. पाडा सोडून लांब गेलेले तरुण घरी परतात. मोरपीस खोचलेल्या टोप्या तयार होतात. सातपुडा रांगा-रांगांमध्ये ढोलाचे आवाज दुमदुमू लागतात. जसा रामायणात प्रभू श्रीरामचंद्र केंद्रस्थानी आहेत तशी आदिवासींमध्ये होळी केंद्रस्थानी आहे.

## होळीची नांदी

आदिवासींना अरण्यविद्या व अरण्यसंस्कृती जन्मतःच अवगत असते. माघ संपला की रानवाटा मोकळ्या कोरड्या होऊ लागतात. ऊन वाढतात. पळस फुलू लागतो. होळीला लागणाऱ्या रंगासाठी लाल फुले वापरली जातात. साग, सलईची पानगळ सुरू होते. मोहाची मोतीया रंगाची फुले टपटप पडू लागतात. तळ्यांवर जंगली जनावर पाणी पिताना दिसू लागतात. फाल्गुन उजाडतो. चंद्र मोठा होऊ लागतो. होळीची चाहूल जंगलभर पसरते. ढोलाचे चामडे बदलविले जाते. मोहाची दारू तयार करून ठेवली जाते. कंत्राटी संस्कृतीला जे शक्य नाही ती होळीची तयारी सातपुड्यातील आदिवासी उत्साहाने करतात. माघी अमावास्येला रोवला गेलेल्या एरंडाच्या दांड्याभोवती लाकूड फाट्यांचा ढिग लागतो. पूर्वी आपल्या पाड्यावरची होळी जास्त दिवस पेटलेली राहावी म्हणून ट्रको गणती लाकडे गोळा व्हायचे. आता हे कमी झाले आहे.

## होळी जळतेय

मी चाळीस वर्षांत चाळीस होळ्या जळताना पाहिल्या. प्रत्येक होळीची शोभा न्यारी. पण डाब, मोलगी, खाऱ्यापडाव, करजाणे, देवझिरीची होळी, उंच ज्वाळा हृदयात कायमच्या घर करून राहिल्या. एका फाल्गुन पौर्णिमेला नंदुरबारचे प्राचार्य दादासाहेब डॉ. बी. एस. पाटील यांनी आम्हाला आमलीबारी, मोलगी, काठीच्या होळीला नेले. प्राचार्य डॉ. बी. एस. दादा इतके विनयशील, इतके समरस होणारे की डोंगर कपारीतला प्रत्येक आदिवासी त्यांना ओळखतो. पौर्णिमेचा चंद्र वर आला होता. पक्ष्यांचे पीस खोचलेल्या टोप्या घालून आदिवासी समूहाने जमत होते. आमची गाडी चांदण्यांतून पुढे जात होती तर एक खवल्या मांजर लोळत असताना दिसले. अंजनच्या झाडा वरून एक वानरीण आडोशाने बघत-बघत समोर गेली. ढोलचे आवाज वाढू लागले. मोलगीच्या होळीभोवती ढोलची संख्या कमी होती. काठीला ती वाढली. एक एक ढोलाच्या भोवती मुले-मुली फेर धरून तालबद्ध नाचत होते. एरंडाच्या उंच दांड्याभोवती होळी रचली गेली होती. काठीच्या होळीला राजेशाही थाट, शिस्त, प्रेम होते. मात्र अमळनेरच्या असंख्य मित्रांच्या आठवणीत आहे ती वैजापूरची होळी. चोपड्याहून वैजापूरला जाताना तेल्याघाट ओलांडला की वैजापूर पासून २ कि.मी. अंतरावर खाऱ्यापाडाव गाव आहे.



येथील होळीला महाराष्ट्र व मध्य प्रदेशातील ८०-९० ढोल येतात. चंद्राला भिडणारा उंच दांडा फुलांची माळ घालून उभा असतो. खाऱ्यापाडावचे पठार आदिवासी स्त्री-परुषांनी व्यापून जाते. दक्षिणेला उंच सातपुडा पर्वत, तर उत्तरेला अनेर नदीच्या पाण्याचा आवाज. चांदण्यात नाले रहस्यमय वाटू लागतात. या डोंगरातच आम्हाला काटक शरीरयष्टीचा कमा भेटला होता. त्याच्याबरोबर काटू , दुकान्या, तान्सूची भेट झाली. सगळ्या आदिवासी पुरुषांनी ढगळ हाफ शर्ट घातले होते. खाली खोचलेले धोतर व खांद्यावर तांबड्या चौकडीचा टॉवेल घेतला होता. हे आणि असे अनेक आदिवासी आमचे स्नेही झाले. त्यांनी ढोलाच्या भोवती पावले कसे टाकायचे हे आम्हाला शिकविले. रात्री आठ वाजता माणसांच्या गर्दीचा पूर वाढू लागला. रात्री बारानंतर सगळे पठार ढोलाच्या सभोवताली फेर धरून नाचणाऱ्या स्त्री-पुरुषांनी भरले. अजून होळी पेटली नव्हती. आपली माती, आपली माणसे यांच्याशी घट्ट नाते टिकवत सगळा आदिवासी समाज नाचत होता. या सणात सातपुड्यातील प्रेम, जिव्हाळा, सुरक्षितता, विश्वास प्रकर्षाने दिसून आला. या रात्री खिशात दहा हजार रुपये घेऊन फिरा. तुम्ही सुरक्षित सुखरूप आहात. ढोलाचे आवाज दाही दिशांना पसरले होते. रात्री दीड वाजता खाऱ्यापाडावच्या मुखीयाने होळीची पूजा केली आणि होळी पेटली. हे बेधुंद क्षण अनुभव बनून राहिले. मोहाची फुले टपटप पडतच होती.

आणखी एक होळी आठवणीत राहिली, ती म्हणजे करजाणे व देवझिरीची. ही होळी ज्ञानपीठ पुरस्कार महाश्वेतादेवी यांच्या हस्ते पेटविली गेली हे तिचे वैशिष्ट्य. सातपुड्याच्या रांगा व झरे ओलांडत आम्ही होळी पौर्णिमेच्या रात्री प्रवास करीत होतो. अंधारात डोळे चमकत होते. हरणांचे होते की कसले याचा उलगडा झाला नाही. डॉ. सुरेश पाटील यांच्या शबरी आश्रमासमोर होळी रचली होती. आश्रमशाळेचे प्रमुख रावण सरांनी महाश्वेतादेवी आणि प्रा. डॉ. गणेश देवी यांचे स्वागत केले. डॉ. गणेश देवी हे बडोद्याचे. भाषा विज्ञान संस्था व भटक्या विमुक्त जमाती हक्क संघटना चालवितात. मोहाच्या दारूचा वास पसरलेला होता. मी डॉ. गणेश देवींशी आदिवासी आणि मोहाची दारू याविषयी बोललो तर सर म्हणाले, की आदिवासींना विरंगुळा व मनोरंजन आहेच कुठे? डॉ. देवींच्या मते, 'आदिवासींना ब्रिटिश काळापासून बदनाम केले आहे. चोर सापडला नाही की ट्राईबमधील माणसाला पकडायचे व गुन्हा लादायचा. निरपराधांना बदनाम करण्याची पद्धत प्रगत लबाडांनी आणली आहे.' महाश्वेता देवींच्या हस्ते होळीची पूजा झाली. पुरणपोळीचा नैवेद्य दाखविला व होळी पेटली. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी फेर धरला. ढोल दुमदुमू लागले. पेटलेल्या होळीच्या प्रकाशात महाश्वेता देवी आकाशातून सातपुड्यात अवतरलेल्या निसर्ग देवता भासल्या. जळणारी होळी, ढोलाचे ताल, आदिवासींचे गाणे, मोहाची फुले टपटप पडतच होती.

## समरसतेचा संदेश

सातपुड्यातील होळी एक दिवसाची नाही. ती शेकडो वर्षांची माणसे जोडणारी ज्वाळांची साखळी आहे. होळी नसती तर या निबिड अरण्यात अशी कोणती भौतिक सुख वाढून ठेवली आहेत? पण द्वेषाकडून प्रेमाकडे, संघर्षाकडून सलोख्याकडे, अलगतावादाकडून समरसतेकडे नेणारी होळी हे दर्शविते की आदिवासी संस्कृती समृद्ध आहे. दोन्ही बाजूला दाट जंगल आणि मधून जाणारा धुळीने भरलेला रस्ता हाच आदिवासींचा जीवनमार्ग. या रस्त्याच्या कोपऱ्या-कोपऱ्यावर चालत आलेल्या रूढी-परंपरा जपत आदिवासी होळीच्या साक्षीने शपथ घेत असतील की या मातीशी आमची बांधिलकी घट्ट टिकवून ठेव, आमची विनम्रता कमी होऊ देऊ नको. म्हणून तर उत्पन्नाची साधन सामुग्री कमी असली, तरी होळी समोर ढोलाच्या तालावर नाचण्याचा त्यांचा उत्साह अपरंपार आहे. होळी म्हटली की ढोल, पळसाची लाल फुले, रानवारा, आदिवासींचे नृत्य, गर्द गुलाबी फुलांनी बहरलेला काटेसावर, सागाची पानगळ, पठारावरचा चंद्र, अहंकाराचा, द्वेषाचा त्याग, येशू-बुध्द-गांधींच्या दया क्षमा प्रेमाची स्वीकृती हे डोळ्यासमोर येते. यामुळेच जगातील महाकवींनी डोंगर कपारी राहणाऱ्यांच्या अश्रू व घामाची गाणी गायली व त्यातच उदात्त जीवनाचे प्रतिबिंब पाहिले. आदिवासी मनोमन म्हणतात 'मी कष्ट करत मोहाच्या झाडाखाली देह ठेवेन. पण सग्यासोयऱ्यांशी, मित्रांशी द्रोह करणार नाही. आदिवासींच्या या त्यागी, प्रेमळ, परमपावन व्यक्तिमत्त्वामुळे आपली पावले सातपुड्याकडे वळू लागतात, ती होळीला वंदन करण्यासाठी.

– प्रा. प्रकाश धर्माधिकारी, अमळनेर.
मो. : 98220 91923

# पुरणपोळीचा नैवेद्य कसा बनवितात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

आपल्या भारतीय संस्कृतीत प्रत्येक सण, उत्सव यावेळी घरोघरी खास पदार्थ बनविले जातात. होळीच्या सणाला सुद्धा होलिका मातेला खास गोड पुरणपोळी अर्पण केली जाते. आणि जुन्या वर्षातील वाईट दहन करून नवीन वर्षात सारे गोड, मंगल व्हावे अशी प्रार्थना केली जाते. पण पुरणपोळी म्हटले की खूप आटापिटा करावा लागतो, ते सारे गृहिणींच्या डोळ्यासमोर येते. डाळ शिजवणे, वाटणे, मग पुरणपोळी बनवणे ही लांबलचक मोठ्ठी प्रक्रिया दिसायला लागते. पण आता हीच पोळी अगदी कमी कष्टात सुंदर बनवू शकतो. पाहायचे आहे?

**साहित्य :** २ वाट्या कणिक, २ चमचे मैदा, केशर अर्धी वाटी दूध, मीठ पोळी लाटताना लावण्यासाठी अर्धी वाटी तांदळाची पीठी, अर्धी वाटी हरभऱ्याची डाळ, पाव वाटी गूळ , पाव वाटी साखर, १ चमचा जायफळ आणि वेलची पूड, तेल, तूप.

**कृती :** प्रथम डाळ स्वच्छ धुवून कुकर मध्ये दुप्पट पाणी घालून ५-६ शिट्ट्या काढून चांगली शिजवून घ्यावी. तोपर्यंत परातीत कणिक घेऊन त्यात मैदा व चिमूटभर चवीसाठी मीठ घालावे. अर्धचमाचा केशर गरम करून बारीक करून दुधात विरघळून घेऊन ते पिठात घालून मस्त मळून घ्यावे. लागेल तसे पाणी घालून तेलाचा हात लावत सैलसर कणिक भिजवून बरून तेल लावून झाकून ठेवावी.



आता डाळ शिजली असेल ती पातेल्यावर चाळणी ठेवून त्यामध्ये काढावी म्हणजे सर्व कट म्हणजेच डाळीचे शिजलेले पाणी व्यवस्थित सर्व पातेल्यात जमेल. वर राहिलेली डाळ मिक्सरमधून एकदम बारीक वाटून घ्यावी. मग त्यामध्ये गूळ आणि साखर घालून मिक्सर मधून फिरवावे. छान एकत्र झाले की एका कढईमध्ये काढून शिजवावे. हे खूप लवकर शिजते. घट्ट होत आले की त्यात १ चमचा ठेवावा. तो खाली न पडता सरळ उभा राहिला की पुरण चांगले तयार झाले, असे समजावे. पूर्वी जास्त पुरण असायचे तेव्हा उलाथणे उभे राहिले की पुरण तयार झाल्याचे समजायचे. खरेतर मायक्रोवेव्ह असेल तर हे कढईत शिजविण्याचे कष्ट सुद्धा वाचतात, त्यासाठी मिक्सरमध्ये डाळ, साखर, गूळ एकदम बारीक झाले की ओव्हनच्या भांड्यात काढून ते भांडे आधी ३ मिनिटे ठेवून बाहेर काढून पुन्हा २ मिनिटे ठेवले की खूप सुरेख पुरण विनासायास तयार होते. शिवाय कढई उलथने लागत नाही आणि कष्ट कमी लागतात. हे पुरण तयार झाले की त्यात जायफळ व वेलची पूड घालून एकजीव करावे. थंड झाले की पोळी साठी पुरण तयार होईल.

कणिकसुद्धा आता मस्त भिजलेली असेल. त्यातील मोठ्ठ्या गोळी एवढी कणिक घेऊन पोळीला बनवताना लावण्यासाठी अर्धी वाटी तांदळाची पिठी किंवा नसेल तर कणिक घ्यावी त्याच्या बरोबर कणकीची पारी तयार करून घ्यावी. साधारण तेवढाच पुरणाचा उंडा घ्यावा व अगदी अलगदपणे त्यामध्ये घालून हळूवारपणे पोळी लाटून गरम तव्यावर भाजावी. आवडत असेल तर करताना वरून तूप सोडून त्यावर भाजावी म्हणजे जास्त खरपूस व खुशखुशीत होते.

**वैशिष्ट्य :** पुरणपोळी अनेकजण अनेक प्रकारे करतात. पण ही काळानरूप झटपट बनणारी पोळीची रेसिपी आहे. ही पोळी दूध घालून भिजविल्यामुळे एकदम लुसलुशीत होते. केशराचा रंग आणि स्वाद दोन्ही पोळीची लज्जत खूपच वाढवतात. महत्त्वाचे म्हणजे पुरण सर्व शिजविल्यावर वाटण्यापेक्षा असे बनविल्यामुळे झटपट व कमी कष्टात होते. होळीसाठी अशी केशरी रंगीत पुरणपोळी नक्कीच सर्वांना नक्कीच आवडेल.



# याद आती है राज साहब की वह होली

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

फिल्म 'बरसात' के बाद बॉलीवुड के ग्रेट शोमैन राज कपूर ने आरके स्टूडियो में होली मनाना शुरू किया था जो यादगार बन गयी। उस आयोजन में फिल्म जगत की लगभग सभी प्रमुख हस्तियां शामिल होतीं। रंग के टैंक में डुबकी, मिठाई ठंडाई, नाच-गाना और चुहलबाजी होली मनाने का वो आत्मीयता भरा अंदाज एकदम जुदा था। बॉलीवुड के ग्रेट शोमैन राज कपूर ने साल १९४८ में मुंबई में आरके स्टूडियो की स्थापना की थी, जो हिंदी फिल्म उद्योग का एक महत्वपूर्ण केंद्र बना। लेकिन इन दिनों वह भव्य आरके स्टूडियो धूल में मिल चुका है। बिल्डरों के हाथों बिक चुकी चेंबूर स्थित इस भव्य इमारत ने अपने अंदर ढेरों सुखद यादें समेट रखी हैं। उनमें से ही एक है आरके की चर्चित होली। कभी एक मुलाकात के दौरान बुजुर्ग हो चुके राज साहब के बड़े बेटे रणधीर कपूर ने उन्हीं यादों को शेयर किया था। पेश हैं होली के खास मौके पर उसी के कुछ अंश उन्हीं की जुबानी- इस २ जून को पापा को गए हुए ३४ साल से ज्यादा हो जाएंगे। पर उनकी यादें मेरे जेहन में अमिट हैं। मैं उनका सर्वाधिक दुलारा बेटा था, एकमात्र ऐसा बच्चा, जो उनकी चीजों का इस्तेमाल कर सकता था। कोई भी त्योहार आते ही उनकी यादें बहुत कचोटती हैं।

होली, दीवाली, गणपति उत्सव – हर त्योहार को वह भव्य ढंग से मनाते थे, ईद, क्रिसमस जैसे पर्व भी। लेकिन होली मनाने का उनका अंदाज एकदम जुदा था। उस दौर के मेरे कई मित्र आज भी आरके की होली को शिद्दत से याद करते हैं। मेरी उम्र तब शायद तीन या चार साल रही होगी, जब उन्होंने फिल्म 'बरसात' की शानदार सफलता के बाद आरके में होली मनाने का रिवाज शुरू किया था। पहले इस होली में फैमिली फ्रेंड और करीबी दोस्त शामिल होते, मगर बाद में पापा जी ने इंडस्ट्री के कई परिचित लोगों को बुलाना शुरू कर दिया था। अमूमन उनकी होली सुबह ११ बजे से शाम चार बजे तक चलती थी। महिलाओं के साथ सिर्फ सूखे रंग से शालीनता के साथ होली खेली जाती थी। उन सबके ख्याल रखने की जिम्मेदारी मम्मी पर थी। हम बच्चों की भी टोली होती थी, अमूमन शम्मी चाचू हमारा ख्याल रखते थे। तब होली मनाने में जो जोश था, वह अब न के बराबर मिलता है। कभी यहां की होली में छोटा- बड़ा कलाकार शरीक होता था। पापा जी की मृत्यु के दो साल पहले तक आरके में होली की रौनक बदस्तूर कायम थी।

# रंगपंचमी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

नि सर्ग आपल्याला भरभरून देतो. त्याचा उपयोग केला तर नवीन काहीतरी केलेल्याचा आनंद नक्की मिळेल. दरवर्षी रंगपंचमीला आपण इको फ्रेंडली रंग बाहेरून आणतो आणि रंगपंचमी खेळतो. यंदाही रंग बाहेरून आणले असतील तर ते वापरा. पण काही रंग निसर्गात असतात. त्यांचाही उपयोग तुम्ही करू शकता.

गावात सागाची झाडं असतात. त्याची पाने चुरडली की हाताला लाल रंग लागतो. मेंदीची पाने चेचली की भगवा रंग दिसतो. गोकर्णची फुलं पाण्यात उकळवली की जांभळा रंग तयार होतो. बीट तर लाल असते. खातानाही तोंड लाल होतं. हे निसर्गान दिलेले रंग आहेत.
विविध रंगांची फुले-पाने असतात त्यापासून तुम्ही छान फ्रेम तयार करू शकता.

या रंगपंचमीला तुम्हाला गारेगार रंगीबेरंगी बर्फाचे घरगुती रंग वापरून क्युब खायचे असतील किंवा तुमच्या फ्रेंड सर्कलमध्ये शायनिंग मारायची असेल तर ही रंगीत, आंबट-गोड रेसिपी नक्की ट्राय करा.

प्रथम लिंबू सरबत बनवा. दोन लिंबू, पाच ते सहा चमचे साखर, चवीनुसार मीठ, चिमूटभर हिंग किंवा जिरे पावडर आणि मोठे दोन ग्लास पाणी. आता बिटाचे तुकडे, गोकर्ण फुलं किंवा जांभळा कोबीचे तुकडे, हळद 2 चमचे यांपैकी घरात जे उपलब्ध असेल ते घ्या आणि एक कप गरम पाण्यात यातील एक किंवा दोन गोष्टी वेगवेगळ्या भांड्यात उकळून घ्या. त्या पाण्याला तो रंग येईल. दोन बर्फाचे ट्रे घ्या. दोन भांड्यात लिंबू सरबत घ्या. त्यात बीट, हळद याचं उकळवून थंड केलेलं पाण्याचे खाण्याचे चार चमचे पाणी लिंबू सरबतात टाका. आता सरबताचा रंग बदलेल. हे सरबत बर्फाच्या ट्रेमध्ये ओता. लाल-पिवळे-जांभळे बर्फाचे क्युब तयार. मित्र-मैत्रिणींबरोबर हे क्युब शेअर करा. ही तुमची रेसिपी त्यांना सांगून चकित करा. आहे की नाही मज्जा.

# रंगांच्या उत्सवाला काही देशांत मनाई...!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

होळी हा आनंद, हास्य आणि रंगांनी भरलेला एक भारतीय सण आहे. तो भूतकाळातील तक्रारी विसरून नातेसंबंध गोड करणे, जुने मतभेद पुसून टाकणे आणि जीवनात नवीन उत्साह आणण्याचे प्रतीक आहे. भारतात, होळी मोकळ्या मैदानात, रस्त्यांवर आणि रंगांचा उत्सव आणि पारंपरिक मिठाईसह साजरी केली जाते. तथापि, जेव्हा आपण सीमा ओलांडून पाहतो, विशेषतः मुस्लिम बहुल देशांकडे, तेव्हा होळीचा रंग आणि उत्साह लक्षणीयरीत्या बदलतो.



अनेक इस्लामिक देशांमध्ये, धार्मिक आणि सामाजिक नियम इतके कडक आहेत की सार्वजनिकरीत्या होळी साजरी करणे अशक्य आहे. काही ठिकाणी, पूर्णपणे बंदी आहे आणि उघडपणे रंग खेळणाऱ्या कोणालाही कठोर शिक्षा भोगावी लागू शकते. तर, कोणते मुस्लिम देश होळीला बंदी घालतात आणि रंगांसह दिसल्यास किती कठोर शिक्षा होते ते पाहूया.

तालिबानच्या राजवटीपासून अफगाणिस्तानात धार्मिक नियम खूप कडक झाले आहेत. हिंदू आणि शीख समुदायांची संख्या कमी झाली आहे म्हणून आता सार्वजनिकरीत्या होळी साजरी केली जात नाही. रंगांशी खेळणे किंवा मिरवणुका काढणे प्रतिबंधित आहे. हा सण घर किंवा मंदिरांपुरता मर्यादित आहे. प्रशासनाने सुरक्षेची हमी दिली असली, तरी खुल्या मैदानात कोणतेही उत्सव होत नाहीत. त्यामुळे अफगाणिस्तानमध्ये होळी साजरी करणे कमी झाले. सार्वजनिक ठिकाणी रंग खेळताना आढळणाऱ्या कोणालाही कायदेशीर कारवाईचा धोका असतो.

सौदी अरेबियाने बऱ्याच काळापासून गैरइस्लामी सणांच्या सार्वजनिक उत्सवांवर बंदी घातली आहे. भारतीय प्रवासी केवळ खासगी जागेत किंवा दूतावासात होळी साजरी करू शकतात. कतार आणि ओमानसारख्या इतर आखाती देशांमध्ये धार्मिक स्वातंत्र्य मर्यादित आहे. सार्वजनिक ठिकाणी रंग खेळण्यास मनाई आहे; खासगी कार्यक्रम केवळ अधिकाऱ्यांच्या परवानगीनेच आयोजित केले जाऊ शकतात. या देशांमध्ये मनाई होळी साजरी करणे पूर्णपणे बंदी आहे किंवा मर्यादित आहे. सार्वजनिक ठिकाणी रंग खेळताना आढळणाऱ्या कोणालाही कायदेशीर कारवाई किंवा मोठा दंड होऊ शकतो.

काही इस्लामिक देशांमध्ये रंग खेळणे किंवा सार्वजनिकरीत्या होळी साजरी करणे हा कायदेशीर गुन्हा मानला जातो आणि शिक्षा बरीच कठोर असू शकते. शिक्षेची व्याप्ती देशाच्या कायद्यांवर आणि स्थानिक सरकारी नियमांवर अवलंबून असते. उदाहरणार्थ, अफगाणिस्तानमध्ये रंग खेळणे किंवा सार्वजनिक ठिकाणी होळी मिरवणूक काढणे बेकायदेशीर आहे. उल्लंघनामुळे अटक, दंड किंवा तुरुंगवास होऊ शकतो.

तालिबान राजवटीत सार्वजनिक मेळावे, विशेषतः धार्मिक अल्पसंख्याकांसाठी, कठोरपणे प्रतिबंधित आहेत. सौदी अरेबियामध्ये, रंगांशी खेळताना पकडल्या गेलेल्या कोणालाही अटक होऊ शकते आणि काही प्रकरणांमध्ये तुरुंगवास किंवा प्रत्यार्पणाची शिक्षादेखील होऊ शकते. कतार आणि ओमानमध्ये, सार्वजनिक ठिकाणी होळी साजरी करण्यास देखील मनाई आहे. उल्लंघन केल्यास दंड, प्रशासकीय कारवाई किंवा अपवित्रतेचे आरोप होऊ शकतात.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे



॥ मंगल ॥ पान

# होळीचा सण एकदम भारी, त्याची रंगतच लई न्यारी..!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

होळी हा रंगांचा सण. अगदी लहानांपासून वृद्धांपर्यंत सर्वांनी एकत्र येऊन आनंदाने साजरा करण्याचा हा सण आहे. रंगांची उधळण तर असतेच, पण मनातील राग होळीच्या दिवळी आरोळ्या मारून, ग्रामीण भागात त्याला बोंबा मारून राग व्यक्त करणे म्हणतात. एखाद्याच्या नावाने शिमगा करण्याची प्रथाही या सणात आहे. या दिवशी अशा गोष्टींकडे दुर्लक्ष करून एक गमतीदार भाग म्हणून स्वीकारला जातो. तरीही अशाप्रकारे आरोळ्या मारताना त्या कृतीने आजूबाजूला तणाव निर्माण होईल, अशी कृती मात्र व्हायला नको हे बंधन प्रत्येकाने पाळायला हवे. होळीच्या दिवशी आपण बऱ्याच वेळा वर्तमानपत्रात राजकीय, सामाजिक कार्य करणाऱ्या लोकांची 'होली है बुरा न मानो' असे म्हणून त्याच्या बोलण्याची किंवा एखाद्या सवयीची मस्करी केली जाते. परंतु या दिवशी ते माफ असते. शक्यतो कोणी मनावर घेतच नाही. होळी हा सण केवळ रंगांचा उत्सव नसून त्यामागे अनेक पौराणिक कथा आहेत. भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांच्यातील अलौकिक प्रेमाचे प्रतीक म्हणून हा सण ओळखला जातो. रंगांनी होळी खेळण्याची परंपरा भगवान श्रीकृष्णांनीच सुरू केल्याचे मानले जाते. दुसरीकडे भक्त प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूची बहीण होलिका त्याला घेऊन आगीत बसली होती. मात्र, ईश्वरी कृपेने प्रल्हाद वाचला आणि होलिका जळून खाक झाली. हाच संदेश देण्यासाठी दरवर्षी होळी पेटवून वाईट विचारांचा त्याग केला जावा हाच त्यामागील विचार आहे. आपल्याकडे नवीन वर्षाची सुरूवात गुढीपाडव्याला होते आणि शेवटचा सण तो होळीचा असतो. यंदा २ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजून ५५ मिनिटांनी होईल. तर तिथीची समाप्ती ३ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजून ०७ मिनिटांनी होईल. काही भाविक २ मार्चच्या रात्रीच होळी दहन करून ४ मार्चला धूलिवंदन साजरे करतील. पंचांगानुसार यंदा होलिका दहनाचा शुभ काळ २ मार्च रोजी सायंकाळी ६.२२ ते रात्री ८.५० पर्यंत असेल. या काळात योग्य विधी करून होलिका दहन करणे शुभ आणि फलदायी ठरेल. जे भाविक ३ मार्चला होळी पेटविणार आहेत, त्यांनी सायंकाळी ७ वाजल्यानंतर, म्हणजेच चंद्रग्रहण संपल्यानंतरच दहन करावे, असा सल्ला दिला जात आहे.

फाल्गुन पौर्णिमेस आपण होळी सण साजरा करत असतो. त्यालाच हुताशनी पौर्णिमा असेही म्हणतात. होळीचा उत्सव, होलिकोत्सव म्हणतात. आपल्याकडे होळीला शिमगा असेही म्हणता तसेच होरी हा शब्द सुद्धा प्रचलित आहे. वसंत ऋतूचे आगमन झालेले असते. वातावरणात, नैसर्गिक बदल झालेला असतो. थंडी संपून ऊन तापायला सुरूवात झालेली असते. उन्हाळ्याची चाहूल लागते. पानगळ सुरू झालेली असते. पळसाची फुले आलेली असतात. पूर्वी होळीच्या वेळी रंग ओढण्यासाठी पळसाच्या फुलाचे महत्त्व आहे. आंघोळीच्या पाण्यात पळसाची फुले टाकून आंघोळ केल्यास त्वचारोग नाहीसा होतो, असे म्हटले आहे. उत्तर भारत, दक्षिण भारत, महाराष्ट्रात होळी सण वेगवेगळ्या पद्धतीने साजरा होतो.

महाराष्ट्रातील खानदेश, विदर्भ, कोकण या ठिकाणी सुद्धा वेगवेगळ्या पद्धतीने होळी साजरी करतात. कोकणात होळी सण जवळपास पंधरा दिवस साजरा केला जातो, तर इतर ठिकाणी



होळी पौर्णिमा धूलिवंदन म्हणजेच धुळवडनंतर रंगपंचमी शिमगा असा हा सण वेगळ्या पद्धतीने साजरा होतो. आपल्याकडे आता होळी पौर्णिमेनंतर दुसऱ्या दिवशी धूलिवंदन म्हणजे धुळवड असते. पण त्याच दिवशी युवा मंडळी धुळवड आणि रंगपंचमी साजरी करतात. डीजे लावून होळीची गाणी लावून नाचतात. एकमेकाला रंग लावतात. संपूर्ण रंगांनी अंग भिजवून घेतात की चेहरे ओळखू येत नाही अशा प्रकारे आनंद व्यक्त करतात. उत्तर भारतात पुतना राक्षिणीला जाळतात. तर दक्षिणेस कामदेवाचे दहन करतात. कोकणात होळीचा उत्सव मोठा असतो. विशेष म्हणजे रत्नागिरी जिल्ह्यात जास्त. तसेच मालवणकडे शिमगो असेही म्हणतात. कोकणात हा सण पाच ते पंधरा दिवस असतो. होळीचा हा मुख्य दिवस असतो. ग्रामदेवतेच्या मुख्य मंदिरासमोर पहिला होम लावण्याचा मान असतो व त्यातील निखारा घेऊन मग गावातील ठिकठिकाणी होळी पेटविली जाते. होळी पौर्णिमा, धुळवड आणि रंगपंचमी असा हा सण साजरा केला जातो. होळी हा रंगांचा सण समजला जातो. तसेच एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी केली जाते. तसेच पारंपरिक नृत्य पारंपरिक गाणी यामध्ये साजरे केले जातात. वंजारी समाजात होळीला फार महत्त्व आहे. पारंपरिक पोषाख घालून नृत्य करण्याची प्रथा आहे.

मध्य प्रदेशात इंदूर, वरती मथुरा, वृंदावन, नंदगावला होळी विशेषत्वाने साजरी होते. मथुरा आणि वृंदावन येथील होळी व तेथील उत्साह अवर्णनीय असतो. मथुरा येथील फुलांची होळी ही जगप्रसिद्ध आहे. यासाठी गुलाब, कमळ, चंपा, चमेली यासारख्या फुलांची होळी साजरी केली जाते. प्रत्येक ठिकाणच्या आख्यायिका वेगवेगळ्या सांगितल्या जातात. महाराष्ट्रात भक्त प्रल्हादाची गोष्ट सांगितली जाते. हिरण्यकश्यपू हे भक्त प्रल्हादाचे वडील. ते त्याचा फारच छळ करायचे. प्रल्हादाने भगवान विष्णूंचे/ नारायणांचे नाव घेऊ नये म्हणून त्याला उंच कड्यावरून लोटले, उकळत्या तेलाच्या कढईत टाकले पण त्याला काहीही झाले नाही. म्हणून बहीण हुंडा/होलिका जिला अग्नीचे भय नसते. तिला वर लाभलेला असतो. तिच्या मांडीवर अग्नीत प्रल्हादाला बसविले जाते. पण प्रल्हादाला काहीच होत नाही. पण हुंडा जळून जाते, अशी कथा आहे. अर्थातच वाईट गोष्टींचा नाश व्हावा, दुर्गुणांचा नाश व्हावा हीच त्यामागील भावना आहे. पूर्वीच्या काळी गावातील प्रमुख चौकात नगारखान्यात होळी पेटविली जात होती. आताही गावातील प्रमुख चौकात बरोबरीने निरनिराळ्या कॉलन्यांतून होळी पेटविली जाते. एका खड्ड्यात एरंडाची उंच फांदी रोवून आजूबाजूला शेणाच्या गोवऱ्या रचतात. लाकूड, झाडाच्या वाळलेल्या फांद्या रचतात. हार घालतात. मुख्य होळी पेटविली की तेथून मशाल पेटवून इतर होळी पेटवितात. असा प्रघात आहे. होळी पेटविल्यावर होळीच्या दर्शनासाठी गर्दी होते. महिला पूजा करतात. पुणरपोळीचा नैवेद्य दाखवितात. पुरुष मंडळी नारळ अर्पण करतात. खोबऱ्याची वाटी होळीच्या निखाऱ्यावर भाजून तो प्रसाद वाटतात. सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. होळीला घरोघरी पुरणपोळी, कटाची आमटी हे समीकरण ठरलेले असते. एकमेकांशी वैर, राग असेल तो होळीत टाकून संबंध सुधारावेत ही भावना असते. होळी सण साजरा करत असताना वृक्षतोड होणार नाही याची दक्षता घ्यावी. वृक्षतोड केल्यास दंडात्मक कारवाई होऊ शकते, याचे भान ठेवावे. तसेच त्याच्या गल्लीतील लोक स्वेच्छेने देतील तेवढ्या गोवऱ्या आणि लाकूड होळी जाळण्यासाठी घ्यायला हवे. उगीच त्यासाठी वादावादी करू नये. सगळ्यांनी एकत्र येऊन साजरा करण्याचा हा सण असल्यामुळे अशा गोष्टी घडायला नको. जेणेकरून बंधुभावाने व आनंदाने साजरा होईल. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदन-धुळवड साजरा करतात. तर पाचव्या दिवशी रंगपंचमी साजरी करतात. सर्वत्र भेदभाव-भांडणे-वैर विसरून रंगांची उधळण करतात. पावरा लोकांमध्ये हा सण मोठ्या प्रमाणात साजरा होतो. बंजारा समाजातही होळी उत्साहाने साजरी होते. रंगांची उधळण करत असताना तो रंग अपायकारक नसावा, तसेच कोणालाही इच्छाविरुद्ध रंगवू नये. पाणी भरलेल्या फुग्यांचा वापर करू नये. शक्यतोवर गुलाल उधळून आनंद व्यक्त करावा. पूर्वी पळसाच्या फुलांचा रंग काढून त्याचा वापर केला जायचा आणि त्यामुळे कुठलीही हानी होत नव्हती. मद्यप्राशन करू नये. या सर्व गोष्टींचे भान ठेवणे महत्त्वाचे आहे. मोठ्या प्रमाणावर भांगही घेत असतात. होळीचाच भाग रंगपंचमीला रंग उधळला जातो. राग मानायचा नसतो म्हणूनच 'बुरा ना मानो होली है'!! म्हणतात अनेक ठिकाणी रंग बरसे...भिगी चुनरिया.., रंग बरसे...होली.. रे होली... रंगोकी होली... अशा गाण्यावर धुंद होऊन नाच केला जातो. आनंदोत्सव साजरा करतात.

होलिका ही वाईट प्रवृत्तीची असल्यामुळे तिचा अंतही वाईट पद्धतीनेच झाला. त्यामुळेच वाईट आचार-विचारांना बाजूला सारणे संपवणे, मनातील वाईट विचार होळीप्रमाणे अग्नीत जाळून राख करणे, हाच होळी साजरा करणे यामागचा उद्देश आहे. याच दिवशी वाईट विचारांचा व वाईट गोष्टींचा त्याग केला पाहिजे. आज आपण बघतोय एकमेकांविषयी चांगल्या भावना नाही, पदोपदी दुष्मनी आढळते. ती नष्ट होणे आजच्या काळात प्रामुख्याने गरज आहे. हे सांगायला नकोच. पूर्वी आपल्या देशात सर्व सणवार बंधुभावाने आणि आनंदाने साजरे केले जात होते आणि त्या सणांचा आनंद घेतला होता. परंतु आता परिस्थिती बदललेली आहे. प्रत्येकाने वेगवेगळ्या प्रकारे आपल्या पद्धतीने सणवार साजरे करायचे ठरवले, असे दिसते. किमान अशा सणवाराप्रसंगी तरी सगळे राग रुसवे बाजूला ठेवून एकत्र यायला हवे. आनंद घ्यायला हवा.

होली के दिन दिल खिल जाते हैं..
रंगो मे रंग मिल जाते हैं..
गीले शिकवे भूल के दोस्तों..
दुष्मन भी गले लग जाते हैं..

असा हा होळीचा सण लय भारी...

## होलिकोत्सव

चैतन्याचा गंध घेवूनी, पळस आला बहरून
माळरानी केशर चांदणे, पांघरलेला फाल्गुन ॥ १ ॥

केशरफुलांनी धुंद होवूनी, डहाळ्या अबोल झाल्या
पानांनाही हेवा वाटे, तीन पाने पळसाला ॥ २ ॥

निसर्गाने रंग उधळीला, खेळे होळीसंगे
उधाण आले आनंदाला, उत्साह तो ओसंडे ॥ ३ ॥

द्वेश, क्रोध मदमत्सर सारे, जाळू अथवा पुरुनी टाकू
पावित्र्याच्या, मानवतेच्या, रंगात भिनूनी जावू ॥ ४ ॥

सर्व मिळूनी चाखूया, पुरणपोळीचा गोडवा
सण होळीचा साजरा होईल, एकोप्याच्या गावा ॥ ५ ॥


निसर्गाची किमया सारी, सृष्टी गेली मोहरून
भर उन्हाचे झाले चांदणे, गारवा गेला गोठून ॥ ६ ॥

प्रेम, करुणा, दया, शांतीचा रंग खरा आगळा
शुभेच्छांची ओंजळ माझी, रंग माझा वेगळा ॥ रंग माझा वेगळा ॥

## रंग

हिरवा, पिवळा,
भगवा, निळा,
लाल, गुलाबी
पांढरा, काळा..
एरव्ही,
विविध जाती धर्मांत,
माणसाने,
वाटून घेतलेले
निसर्गदत्त हे 'रंग'
रंगपंचमीला, धुळवडीला
सहर्ष मिसळून जातात.
एकमेकांत दरवर्षी,
आनंदाने...
निसर्गनिर्मित,
निर्जीव रंगांचा,
हा संदेश म्हणजे
बुद्धिवान
अन् मंदू असलेल्या
सजीव माणसाच्या,
कानशिलात,
सणसणीत,
चपराकच
म्हणावी लागेल...

## श्रीब्रह्मचैतन्य महाराज



# मायेच्या तावडीतून सुटण्यास नाम हेच साधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

परमेश्वराची भक्ती करावी, त्याचे नामस्मरण करावे, असे पुष्कळ लोकांना मनातून फार वाटते, पण काही ना काही कारणाने ते घडत नाही. असे का व्हावे ? तर माया आड येते. मायेला बाजूला सारून भगवंतापर्यंत कसे पोहोचायचे? माया ही भगवंताच्या सावलीसारखी आहे; तिला सोडून तू ये असे त्याला म्हणणे म्हणजे तू येऊ नकोसफ असे म्हणण्यासारखेच आहे; कारण एखाद्या इसमाला तू ये, पण तुझी सावली आणू नको म्हटले तर कसे शक्य आहे? म्हणून माया ही राहणारच. आपण तिच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत पोहोचायचे कसे हाच प्रश्न आहे; आणि या प्रश्नाचे उत्तर एकच भगवंताचे नाम घेणे. नामानेच मायेच्या तावडीतून सुटून भगवंतापर्यंत जाता येते. जसे व्यक्तीशिवाय सावलीला अस्तित्व नाही, तसे मायेला स्वतंत्र अस्तित्व नाही. तसेच तिला स्वतंत्र शक्तीही नाही, कारण व्यक्तीच्या हालचालीप्रमाणेच तिची हालचाल होते. व्यक्ती न दिसली तरी तिची सावली जशी दिसते, त्याप्रमाणे मायेचे अस्तित्व मात्र जाणवते. मायेची सत्ता भगवंतावर नाही. एखादा इसम पूर्व दिशेला चालला आहे, तर त्याची सावली त्याच्यामागून त्याच दिशेने जाईल; त्या सावलीच्या मनात जर दिशा बदलून पश्चिमेकडे जाण्याचे आले तर तिला ते शक्य नाही. तो मनुष्यच जर पश्चिमेकडे जाऊ लागला तरच तिला त्या दिशेकडे जाणे शक्य आहे. बाचाच अर्थ, माया भगवंताच्या अधीन

आहे. सर्व विश्व हे मायारूप आहे; म्हणजे ते परमेश्वराची छाया आहे; बाचा अर्थ, या विश्वाला आधार परमेश्वरच आहे. आता या मायेच्या तावडीतून सुटून परमेश्वराकडे कसे जायचे ? समजा, एखाद्या इसमाला एका मोठ्या व्यक्तीला भेटायचे आहे. पण त्याच्याकडे सरळ जाणे शक्य नाही, कारण त्याच्या घराच्या दारावर रखवालदार, कुत्रे वगैरे आहेत. त्यांच्या तावडीतून सुटून गेले तरच मालकाची भेट होणार. पण समजा, मला अमक्या दिवशी येऊन भेटावे अशा मजकूराचे त्या मालकाच्या सहीचे पत्र जर त्याला आले असेल, तर ते पत्र त्या रखवालदाराला दाखविताच तो त्याला बिनतक्रार आता सोडील आणि मालकाची भेट होईल. तसे भगवंताचे नाम, म्हणजे भगवंताच्या सहीचे पत्र, जर आपण घेऊन गेलो तर मायारूपी रखवालदार ती सही पाहून आपल्याला आत सोडील आणि भगवंताची भेट होईल. म्हणून माया तरून जायला भगवंताचे नामस्मरण हाच रामबाण उपाय आहे. नामस्मरणात खूप तल्लीन व्हावे, देहाचा विसर पडावा. देहबुद्धी विसरून नाम घेणे हेच निर्गुण होणे आहे. भगवंत जर कृपण असेल तर तो नामभक्ती देण्यात आहे. म्हणून त्याला आळवाचे आणि तुझ्या नामाचे प्रेम दे हेच मागावे. बाकी सगळे देईल, पण हे नामप्रेम तो फार क्वचित् देतो. म्हणून आपण तेच मागावे. रामाचे अनुसंधान नित्य ठेवावे आणि आनंदात राहावे.

## होळी आणि धूलिवंदन

# रंगांचा उत्सव की सामाजिक आत्मपरीक्षणाची संधी ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला साजरा होणारा होळीचा सण हा केवळ रंगांचा उत्सव नाही, तर तो भारतीय संस्कृतीच्या अंतःकरणातील आनंद, बंधुभाव आणि परिवर्तनाचा संदेश घेऊन येतो. दुसऱ्या दिवशी साजरे होणारे धूलिवंदन म्हणजे रंगांच्या उधळणीतून नात्यांना नवसंजीवनी देण्याचा दिवस असतो. गावोगावी पेटणाऱ्या होळीच्या ज्वाला आणि सकाळी उधळले जाणारे रंग यामागे एक सखोल तात्त्विक अर्थ दडलेला आहे, ते म्हणजे वाईट प्रवृत्तींचे दहन आणि चांगुलपणाचा स्वीकार. होळीचा उगम पौराणिक कथांशी जोडलेला आहे. दैत्यराज हिरण्यकश्यपू आणि त्याची बहीण होलिका यांची कथा आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. भक्त प्रल्हादाच्या निश्चयी श्रद्धेवर मात करण्यासाठी होलिकेने अग्नीत प्रवेश केला; परंतु सत्य, श्रद्धा आणि भक्तीच्या बळावर प्रल्हाद वाचला आणि होलिका भस्मसात झाली. या कथेतून मिळणारा संदेश आजही तितकाच प्रभावी आहे. अहंकार, अन्याय आणि अत्याचाराचा अंत निश्चित असतो. परंतु प्रश्न असा आहे की, आपण केवळ होळी पेटवतो की खरोखरच आपल्या मनातील ङ्गहोलिकाफ जाळतो? आजच्या समाजात असूया, मत्सर, द्वेष, राजकीय स्वार्थ, धार्मिक ध्रुवीकरण यांसारख्या प्रवृत्ती वाढताना दिसतात. अशा वेळी होळी ही केवळ विधी न राहता आत्मपरीक्षणाची संधी ठरायला हवी.

धूलिवंदन म्हणजे रंगांचा खेळ. सकाळी अंगावर रंग उधळत आपण एकमेकांना बुरा न मानो होली है असे म्हणत हसतखेळत क्षमा मागतो, क्षमा देतो. समाजातील भेद, जात, धर्म, वर्ग, श्रीमंती-गरीबी क्षणभरासाठी का होईना, विरघळतात. रंगांचे वैशिष्ट्य असे की ते प्रत्येकाला सारखेच रंगवतात. पांढरा कुर्ता असो वा महागडी साडी, रंग लागला की सगळे समान ! आजच्या काळात ही समता टिकवणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. सोशल मीडियाच्या आभासी जगात आपण ङ्गलाईक्सफ आणि ङ्गफॉलोअर्सच्या मोजपट्टीवर नाती मोजतो. प्रत्यक्ष भेटीगाठी कमी होत चालल्या आहेत. धूलिवंदन हा सण आपल्याला सांगतो माणसांमध्ये मिसळा, मनमोकळे हसा, जुने राग विसरा. अलीकडच्या काळात होळीच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर लाकूड जाळले जाते. रासायनिक रंगांचा वापर वाढतो. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते, त्वचेच्या तक्रारी वाढतात. सण साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे. शेतीप्रधान देशात फाल्गुन हा हंगाम संपण्याचा आणि नवीन पीक येण्याचा काळ



आहे. होळी ही निसर्गाच्या चक्काशी जोडलेली परंपरा आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक होळी, नैसर्गिक रंगांचा वापर आणि पाण्याची बचत हे आजचे ङ्गनवे संस्कारफठरायला हवेत. महाराष्ट्रात धूलिवंदनानंतर रंगपंचमीही मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. नागपूरसारख्या शहरात तर मित्रपरिवार, कुटुंबीय आणि समाजातील विविध घटक एकत्र येऊन हा सण आनंदाने साजरा करतात. परंतु काही ठिकाणी रंगांच्या नावाखाली जबरदस्ती, मद्यपान, महिलांवर गैरवर्तन यासारखे प्रकारही घडतात. हे चित्र चिंताजनक आहे. सणांचा आत्मा हा आनंद आणि सन्मानात असतो; दडपशाहीत नाही. रंग लावला म्हणजे अधिकार मिळाला अशी मानसिकता बदलायला हवी. धूलिवंदन हे 'सन्मानाने रंगवणे' शिकवते, 'जबरदस्तीने रंग चोपडणे' नव्हे. भारतीय समाजजीवनात सणांचे राजकारणाशीही नाते आहे. काही वेळा सणांच्या माध्यमातून समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न होतात. होळीचा खरा संदेश मात्र एकात्मतेचा आहे. विविधतेत एकता ही भारताची ताकद आहे. होळी आपल्याला सांगते मतभेद असू द्या, पण मनभेद नकोत.

आज देशासमोर बेरोजगारी, महागाई, शिक्षण आरोग्याच्या समस्या, शेतकऱ्यांचे प्रश्न उभे आहेत. होळीच्या ज्वालेसमोर उभे राहून आपण या प्रश्नांवरही विचार करायला हवा. केवळ व्यक्तीगत राग-द्वेष जाळून चालणार नाही; समाजातील अन्याय, विषमता आणि भ्रष्टाचार यांनाही जाळण्याचा निर्धार हवा. इतिहासात होळीच्या उत्सवात स्त्रियांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर राहिला आहे. लोकगीते, फुगड्या, सामूहिक नृत्य यांतून स्त्रियांनी आपला आनंद व्यक्त केला. आजच्या काळात स्त्री पुरुष समानतेचा संदेशही या सणातून द्यायला हवा. महिलांना सुरक्षित आणि सन्मानाने सण साजरा करता यावा, ही समाजाची जबाबदारी आहे. होळीच्या निमित्ताने बाजारपेठा गजबजतात. रंग, पिचकाऱ्या, मिठाई, पारंपरिक पदार्थ या सर्वांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. गावरान पुरणपोळी, करंजी, गूळ-पोहे यांचा सुगंध घराघरांत दरवळतो. सण हा अर्थचक्रालाही गती देतो. मात्र, खर्चाच्या स्पर्धेत अडकून मूळ आनंद हरवू नये, याची जाणीव ठेवायला हवी.

होळी आणि धूलिवंदन हे नात्यांच्या पुनर्बांधणीचे दिवस आहेत. वर्षभरात गैरसमज होतात, कटुता वाढते. पण या सणाच्या निमित्ताने आपण एकमेकांना भेटतो, मिठी मारतो, रंगपंचमीच्या शुभेच्छा देतो आणि नवे वर्ष नव्या उत्साहाने सुरू करतो. ज्या समाजात संवाद थांबतो. तिथे तणाव वाढतो. होळीचा रंग म्हणजे संवादाची सुरुवात. धूलिवंदन म्हणजे अहंकाराची धूळ झटकून टाकणे, सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्मनातील होळी. आपल्या मनात साठलेले राग, भीती, न्यूनगंड, असुरक्षितता या सर्वांना जाळणे आवश्यक आहे. होळीची ज्वाला आपल्याला धैर्य देते; धूलिवंदनाचा रंग आपल्याला आनंद देतो. आजच्या वेगवान, तणावपूर्ण जीवनात आपण आनंद साजरा करायलाही विसरलो आहोत. होळी हा सण सांगतो, जगणे म्हणजे केवळ स्पर्धा नव्हे, तर उत्सवही आहे.

होळी आणि धूलिवंदन हे केवळ परंपरा नाहीत; ते जीवनदृष्टी आहेत. अन्यायावर न्यायाचा विजय, द्वेषावर प्रेमाचा विजय, निराशेवर आशेचा विजय हा संदेश या सणात दडलेला आहे. यावर्षी होळी पेटवताना आपण केवळ लाकूड जाळू नये; आपल्या मनातील कटुता जाळू या. धूलिवंदन साजरे करताना केवळ रंग उधळू नये; प्रेम, सन्मान आणि समतेचे रंग उधळू या. रंगांच्या या सणात प्रत्येकाच्या आयुष्यात आनंदाची उधळण होवो, समाजात सौहार्द फुलो आणि आपल्या अंतःकरणातील होलिका भस्मसात होवो, हीच अपेक्षा.

**दै. ग्लोबल महातेज परिवारातर्फे सर्वांना होळी आणि धूलिवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा !**

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**